# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला
## कृषि तंत्र विद्यालय, वरूड (पुसद)

प्राचार्य, कृ.तं.वि.,वरुड दुरध्वनी कमांक 9665630251

जा.क.प्राचार्य / कृतंवि / आस्था /975/ 2025 दिनांक 26 / 03 / 2025

कार्यालयीन सुचना

कृषि तंत्र विद्यालय, वरूड ता. पुसद जि. यवतमाळ या कार्यालयाचे भांडारातील निरूपयोगी जडवस्तू साहीत्य (लोखंडी, लाकडी, प्लास्टीक) चा जाहीर लिलाव दिनांक ११/०४/२०२५ रोजी दुपारी ०२:०० वाजता कृषि तंत्र विद्यालय, वरूड (पुसद) या कार्यालयात करण्यात येणार आहे. तरी सदर निरूपयोगी जडवस्तू साहीत्य (लोखंडी, लाकडी, प्लास्टीक) ज्यांना विकत घ्यावयाचे असतील त्यांनी लिलावाच्या वेळी लिलावाच्या अटि व शर्ती माण्य असल्यास अमानत रक्कम रू. २०००/— भरून नोंदणी करावी. सोबत आधार कार्ड प्रत सादर करावी. कार्यालयीन वेळेत साहीत्य पाहावयास मिळेल. सदर नियम व अटि व शर्ती विद्यापीठाच्या www.pdkv.ac.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

प्राचार्य
कृषि तंत्र विद्यालय
वरुड (पुसद)

## लिलावाच्या अटि व शर्ती

०१) लिलावात निघालेले भंगार निरूपयोगी जडवस्तू साहीत्य (लोखंडी, लाकडी, प्लास्टीक) यांचा लिलाव जसे आहे, जेथे आहे या तत्वावर होईल.

०२) जून्या भंगार साहीत्याचा लिलावात समावेश असून त्यांचा लिलाव करण्यात येईल.

०३) ज्यांना लिलावात भाग घ्यावयाचा आहे त्यांनी अनामत रक्कम दिनांक ११/०४/२०२५ रोजी दुपारी १२:०० पर्यंत रोखीने रक्कम भरना करावे तसेच दुपारी १२:०० नंतर कुठलीही अनामत रक्कम स्विकारली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

०४) ज्यांनी अनामत रक्कम दिनांक ११/०४/२०२५ रोजी दुपारी १२:०० च्या आत भरली असेल त्यांनाच पुकारा क्रमांक देण्यात यईल व त्यांनाच लिलावाच्या ठिकाणी आधारकार्ड च्या झेरॉक्स सह हजर राहता येईल व लिलावात भाग घेता येईल. त्या व्यतीरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस लिलावात भाग घेता येणार नाही.

०५) लिलाव समीतीचे सदस्य व संबधीत कार्यालयीन कर्मचारी लिलावाचे ठिकाणी उपस्थीत राहू शकतील व निरीक्षण करू शकतील.

०६) लिलाव समिती बोलणी बोलणाऱ्या व्यक्तीची जास्तीत जास्त बोली माण्य असेल त्यांना लिलावाची बोली पाहून माण्यता देण्यात येईल व त्या बाबतचा अंतीम निर्णय गठीत समिती घेईल.

०७) अपेक्षीत किंमत आल्याशीवाय लिलावाची बोली माण्य करणे लिलाव समितीच्या निर्णयावर अवलंबून राहील.

०८) साहीत्य व वस्तूंची बोली अंतीम झाल्यास किंमतीच्या ५० टक्के रक्कम त्याच दिवशी व उर्वरीत ५० टक्के रक्कम लिलाव अंतीम झाल्यापासून ०३ दिवसात भरावी लागेल. रक्कम न भरल्यास सदर लिलाव रदद करण्यात यईल.

०९) बोली कायम झाल्यास सबंधीत व्यक्तीनी सर्व साहीत्य ताब्यात मिळताच स्वखर्चाने उचल करणे व वाहून नेण्याची त्या नंतर सर्व खर्चाची व जोखमेची जबाबदारी त्यांची स्वताची असेल.

१०) लिलाव झालेल्या साहीत्याची पूर्ण किंमत भरल्यानंतर सदर वस्तू खरीददाराने ०३ दिवसाच्या आत कार्यालय परीसरातून स्वताच्या ताब्यात घ्यावी अन्यथा सदर साहीत्याची देखभालीची व गहाळ झाल्यास कार्यालयाची जबाबदारी राहणार नाही याची नोंद घ्यावी.

११) ज्यांची बोली अमाण्य ठरली असेल त्यांना अनामत रक्कम परत करण्यात यईल.

१२) साहीत्याची वाहतूक करतांना कार्यालयातील मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसाण होणार नाही याची जबाबदारी खरीददाराची असेल.

१३) लिलावाबाबत काही तक्रार असल्यास त्याच दिवशी तशी लेखी स्वरूपात लिलावाच्या ठिकाणी लिलाव सुरू होण्यापूर्वी दयावी अन्यथा तक्रारीचा विचार करण्यात येणार नाही. लिलावात सहभागी नसलेल्या व्यक्तीची तक्रार स्विकृत करण्यात येणार नाही.

१४) लिलावात काही अडचण अथवा वादविवाद उत्पन्न झाल्यास गठीत समितीचा निर्णय अंतीम आणि सर्वानाचा बंधनकारक राहील.

१५) लिलाव कोणत्याही कारणास्तव रदद करण्याचा अधिकार गठीत समितीकडे राखून ठेवला आहे.

१६) लोखंडी साहीत्य विक्रीची बाली प्रतीकिलो दरा प्रमाणे राहील, या मध्ये निरूपयोगी जडवस्तू प्लास्टीक लोखंडी व लाकडी साहीत्य इतर पातळ व जाड साहीत्याचा समावेश राहील तसेच प्रत्यक्ष रक्कम अंतीम वजन परीमाणानूसार भरावी लागेल. सदर साहीत्य उचल करणे हमाली व वाहतूकीची जबाबदारी घेणाऱ्याची राहील तसेच वजन करण्याची व त्यासाठी येणाऱ्या खर्चाची जबाबदारी सूध्दा राहील.

प्राचार्य
कृषि तंत्र विद्यालय
वरूड (पुसद)